# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं १५/२०१८

१.श्री. हेमंत प्रभाकर हिंगे } तक्रार अर्जदार

विरूध्द

१.औंध शिक्षण मंडळ, औंध ता. खटाव जि. सातारा } वि. प
२.राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध ता. खटाव, जि. सातारा येथील प्रगोळशाळा परिचर श्री. हेमंत प्रभाकर हिंगे यांनी तक्रार अर्ज तक्रार निवारण समितीकडे दि. २३/०४/२०१५ दाखल केला आहे

**तक्रारीचे स्वरूप :**

श्री. हेमंत प्रभाकर हिंगे यांनी आपल्या तक्रारी अर्जात असे नमुद केले आहे की, मी राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय , औंध येथे पदार्थ विज्ञान विभाग येथे दि. २९/११/१९९४ पासून प्रयोगशाळा परिचर म्हणून नियुक्ती आहे. माझे माहे ऑक्टोंबर २०१४ ते आज अखेर कोणतीही पूर्व सुचना न देता माझा पगार रोखला आहे. तसेच मी महाविद्यालयात रोज उपस्थित असूनही मस्टर व बायोमॅट्रिक मशिन हजेरी सही साठी दिली जात नाही. मी या संदर्भात मा. प्राचार्य, मा. कुलगुरू, मा. बी. सी. यु. डी. मा. सहसंचालक, संचालक औंध शिक्षण मंडळ औंध यांना लेखी पत्राने कळवित होतो. माझेवर खोटे आरोप ठेवून चौकशी सुरू केली आहे. माझी नियुक्ती दि. २९/११/१९९४ ची असलेने स्टॅन्डर्ड कोड प्रमाणे केलेली नाही.

दि. १३/०६/२०१८ रोजी तक्रारदार श्री. हेमंत प्रभाकर हिंगे आपले म्हणणे मांडणेकरिता हजर होते. दि. १३/०६/२०१८ रोजी संस्थे तर्फे विश्वस्थ मंडळाचे प्रतिनिधी आणि महाविद्यालयांतर्फे प्राचार्य हजर होते. त्यांनी खालीलप्रमाणे म्हणणे मांडले.

तक्रारदार श्री. हिंगे यांनी आपल्या तक्रार अर्जात नमुद केलेल्या सर्व तक्रारीसंदर्भात संस्थेने त्याचेवर आरोप पत्र बजावून चौकशी अधिकारी याची नेमणूक करून सदर चौकशी अधिकाऱ्यांनी रितसर चौकशी केलेचे समितीसमोर मांडले.

सदर श्री. हेमंत हिंगे यांना दि. ०७/०५/२०१५ रोजीच्या आदेशाने बढतर्फ केले असल्याबद्दलचा संस्थेचा आदेश त्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ५९ प्रमाणे मा. विद्यापीठे आणि कॉलेज ट्रिब्युनल पूणे, यांचेकडे अपील क्रं ६/२०१५ चे हेमंत हिंगे यांनी दाखल केलेले होते. त्यावर मा. पिठासन अधिकारी यांनी आपल्या न्यायनिर्णयांत सविस्तर विवेचन करून दि. २५/०४/२०१७ रोजीच्या आदेशाने चौकशी अधिकाऱ्याचा निर्णय योग्य व बरोबर असलेचे मान्य केले व हेमंत प्रभाकर हिंगे यांचे अपील नामंजूर केले.

सदर न्यायाधिकरण निकालाची प्रत समिती समोर सादर केली. त्यामुळे त्याच विषयासंदर्भातील त्यांची तक्रार या तक्रार निवारण समितीसमोर चालविता येणार नाही. सदरील मा. पिठासन अधिकाऱ्यांचा न्यायनिर्णय या समितीवर बंधनकारक आहे. तसेच एकाच विषयासंदर्भात पुन्हा—पुन्हा वेगवेगळया स्तरांवर वेगवेगळे निर्णय कायदयात करता येत नाहित व तसे करणेची कोणतीही जरूरी नाही. सबब, या समितीने एकमताने श्री. हेमंत प्रभाकर हिंगे यांचा अर्ज नामंजूर करणेचे निश्चित करून तसा ठराव करणेत आला.

म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

## आदेश –

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध, ता. खटाव जि. सातारा येथील प्रगोळशाळा परिचर श्री. हेमंत प्रभाकर हिंगे यांचा दि. २३/०४/२०१५ रोजीचा अर्ज नामंजूर करणेत आला आहे.

वरिल प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना कळविण्यात यावे.

दि. १३/०६/२०१८

अध्यक्ष

अध्यक्ष
तक्रार निवारण समिती,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सदस्य

सदस्य
अमित कुलकर्णी

सदस्य

सदस्य

सदस्य सचिव